नोंदणी क्र. २२६/१४ एफ-१८५६ (गोंदिया)

# DINBANDHU
## Gramin Vikas sanstha, Deori
## दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी

ता.देवरी जि.गोंदिया.




# वार्षिक अहवाल
## २०२२-२३

# प्रस्तावना

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी या संस्थेची संस्था नोंदणी सन-१८६० च्या अधिनीयम २१ अन्वये दि.२६ डिसेंबर २०१४ रोजी धर्मदाय संस्था म्हणुन साहाय्यक धर्मदाय निबंधक गोंदिया यांच्याकडे नोंदणीकृत झाली. दिनबंधु ग्रामीण विकास संस्था ही स्वयंसेवी सामाजीक संस्था असल्याने ना नफा-ना तोटा या तत्वानुसार ही संस्था सामाजिक क्षेत्रात जनसामान्यांसाठी विविध लोकाभिमुख कार्य करीत आहे.

आर्थिक वर्ष २०२२-२०२३ या वर्षात प्रामुख्याने रोजगार व स्वयंरोजगार, आरोग्य, स्वच्छता, आर्थिक असे सामाजीक दायीत्व या विषयांवर संस्थेने कार्य केले आहे. या वर्षात संस्थेने या विषयांवर कार्य करत असतांना संस्थेला आता पर्यंत मिळालेल्या कार्याची फलश्रृती एका वेगळया रुपात दिसुन आली असल्याने संस्थेतील सर्व पदाधिकाऱ्यांचा आनंद आणि उत्साह द्विगुणीत झाला आहे.

दिवसेदिवस होत असलेल्या प्रगतीमागे जनसामांन्याकडुन मिळालेले सहकार्य आणि आशिर्वाद आहेत. ते उत्तरोत्तर निरंतर मिळत राहावे अशी संस्थेच्या विस्वस्त मंडळाकडुन प्रार्थना आहे.

''सेवेने अंगी सामर्थ्य येते ।
जे जे बोलाल तेची होते ।
हस्ते परहस्ते सर्वची होते ।
काम त्याचे ।।''

- ग्रामगीता

# अध्यक्षांचे मनोगत

सप्रेम नमस्कार...

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी या संस्थेचा सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाचा अहवाल सादर करत असतांना आम्हाला अतीशय आनंद होतो आहे त्याचे कारण असे की संस्था विविध क्षेत्रात सामाजीक उपक्रमाचे आयोजन करत असते परंतु या वर्षात कार्य करत असतांना काही विशिष्ट क्षेत्रात संस्थेला कार्य कराव लागल.

संस्था स्थापनेपासुन अनेक विषयात कार्य करत आलेली आहे. परंतु या आर्थिक वर्षात संस्थेचे प्रमुख लक्ष केंद्रीत असलेले शिक्षण या क्षेत्रासोबत स्वच्छता, आरोग्य, रोजगार आणि समाजाची आर्थिक स्थिती बळकट करण्यासाठी काय करता येईल अशा क्षेत्रात संस्थेनी या वर्षात कार्य केलेले आहे.

प्रत्येक वर्षात वेगवेगळया उपक्रमांना संस्थेला जनसामान्यांचे मिळणारे सहकार्य व प्रेम यात वाढ होत असुन आम्ही हाती घेत असलेल्या सर्व उपक्रमांना असाच प्रतिसाद मिळत राहील हीच अपेक्षा !

ग्रामसुधारणेचे मुलमंत्र । सज्जनांनी व्हावे एकत्र ।
संघठन हेची शक्तीचे सुत्र । ग्रामराज्य निर्माण करी ।।

आपला विश्वासू

कुलदिप द. लांजेवार
अध्यक्ष
दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी

## संस्थेविषयी....

संस्थेचे नांव : दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी

नोंदणी क्रमांक : महाराष्ट्र-२२६/१४ (गोंदिया), संस्था अधिनीयम, १८६० नियम २१ एफ-१८५६ (गोंदिया), मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० नियम २९

संस्थेचे पॅन क्रमांक : AADTD6124H

कार्यालयाचा पत्ता : C/o. श्री.दयारामजी लांजेवार, शेडेपार रोड, पंचशिल चौक, देवरी ता.देवरी, जि.गोंदिया ४४१९०१ (महा.)

संपर्क क्रमांक : ७२१८९४२६२६, E-Mail : dgvsdeori@gmail.com

वेबसाईट : www.dinbandhugraminvikassanstha.org

### संस्थेचे उद्देश :

१) आदिवासी बहुल, नक्षलग्रस्त, अतिदुर्गम भागातील जन सामान्यांना भेडसावणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी मदत करणे.

२) सुशिक्षीत बेरोजगार ग्रामीण युवकांना विविध क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे.

३) आदिवासी व इतर समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणुन त्यांना स्पर्धा परिक्षेच्या संदर्भात सर्वतोपरी मदत करुन प्रशासकीय सेवेत रुजु होण्यासाठी सक्षम करणे.

४) ग्रामीण व नागरी क्षेत्रातील शेतकऱ्यांसाठी कृषि, आरोग्य, शिक्षण, मुलभुत अधिकार या सारख्या लोकाभिमूख विषयांवर जनजागृती करुन नागरीकांना विकासाच्या प्रवाहात आणणे.

५) प्रशासनासोबत राष्ट्रीय कार्यक्रमात सहभागी होऊन, जनहितार्थ कार्यक्रमांचे आयोजन करणे.

### संस्थेची विशेषता :

१) आदिवासी बहुल, नक्षलग्रस्त, अतिदुर्गम भागातील जन सामान्यांना भेडसावणाऱ्या अडचणी दुर करण्यासाठी संस्था निरंतर मदत करीत आहे.

२) सुशिक्षीत बेरोजगार उमेदवारांसाठी संस्थेने अनेक रोजगार मेळाव्यांचे आयोजन केले तसेच ते कार्य पुढेही सुरु राहील असे संस्थेचे ध्येय आहे.

३) स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सर्व मदतीसह योग्य तज्ञांचे मार्गदर्शन मिळवुन देण्यासाठी संस्था सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे.

४) प्रशासनासोबत जनसामान्यांसाठी आयोजीत कार्यक्रमात संस्था नेहमीच सहभागी होवून यशस्वी कार्यक्रम करण्यासाठी सहकार्य करीत असते.

५) नैसर्गीक साधन संपत्तीचे जतन करणे तसेच शिक्षण, आरोग्य, जलसंवर्धन, ग्रामस्वच्छता या विषयांवर नियमीत मार्गदर्शन करीत राहाणे, जनजागृती करणे हे संस्थेचे प्रमुख कार्य आहे.

## संस्थेचे कार्य

### सामाजीक/शैक्षणिक :

**१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनी कृतीशील उपक्रमाचे आयोजन** (दि.१५ एप्रिल २०२२)

स्थान :- सार्व.वाचनालय व अभ्यासिका केंद्र दुर्गा चौक, देवरी

**आयोजनाचे उद्देश :**

आदिवासी बहुल नक्षलग्रस्त म्हणुन जिल्हयात आळख असलेल्या देवरी तालुक्यातील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची व सलग अभ्यासाची आवळ निर्माण व्हावी आणि भारत देशाचे सर्वोच्च ग्रंथ असलेल्या ''भारतीय संवीधानाचे'' निर्माते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना कृतीशील अभिवादन व्हाव या हेतुने महामानवाच्या जयंतीदिनी सलग ५ तास वाचन करुन कृतीशील अभिवादन या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

**उपस्थित मान्यवर :**

मा.श्री.राम गायधने से.नि.मुख्याध्यापक, मा.श्रीमती रझिया बेग मुख्याध्यापिका के.एस.जैन विद्यालय देवरी, मा.श्री.चेतनकुमार उईके विश्वस्त दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, मा.श्री.कुलदिप लांजेवार विश्वस्त दिनबंधु ग्रामीण विकास संस्था.





## संस्थेचे कार्य

### आयोजनाचे साफल्य:

आदिवासीबहुल नक्षलग्रस्त क्षेत्रातील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची व अभ्यास करण्याची आवड निर्माण व्हावी तसेच महापुरुषांच्या जयंती व स्मृतीदिनाचे महत्व कळावे या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन स्थानीक देवरी येथे दरवर्षी संस्थेकडुन होत असुन याला भरपुर प्रतिसाद मिळाला. जवळपास २५० बाल, तरुण व जेष्ठ नागरीकांचा यामध्ये सहभाग राहीला आणि या उपक्रमाची दखल विविध वर्तमानपत्रांनी सुध्दा घेतलेली आहे.


नवराष्ट्र

**सलग 5 तास वाचन करून बाबासाहेबांना अभिवादन**

दीनबंधू ग्रामीण विकास संस्थेचा अभिनव उपक्रम : विद्यार्थ्यांचा सन्मान

गोंदिया, ब्युरो. विद्यार्थ्यांनो, जागृत होऊन शिक्षण घ्या, असा संदेश देणारे जगातील सर्वोत्तम विद्यार्थी म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, त्यांच्या जयंतीनिमित्त केले जाणारे अभिवादन कृतीशील असले पाहिजे, हा उद्देश ठेवून देवरी येथील दीनबंधू ग्रामीण विकास संस्थेच्या वतीने सलग पाच तास ... आंबेडकर यांच्या प्रतीमेला माल्यार्पण आणि दीप प्रज्वलन ... मार्गदर्शन केले. तत्पश्चात वाचनाला सुरुवात करण्यात आली. सलग पाच तास वाचन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. दोन सत्रांमध्ये कार्यक्रम पार पडला. समारोपीय सत्राचे आयोजन सेवानिवृत्त मुख्याध्यापक राम गायधने यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. यावेळी नगरसेविका नूतन सयाम, आंतरराष्ट्रीय मानवाधिकार फेडरेशनच्या अध्यक्षा रजिया बेग, अध्यक्ष कुलदीप लांजेवार उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी समयोचित मार्गदर्शन केले.


देशोन्नती

**सलग पाच तास अभ्यास करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन**

दिनबंधु ग्रामीण विकास संस्थेचा अभिनव कृतिशील उपक्रम


**सलग ५ तास वाचन करून बाबासाहेबांना आदरांजली**

दिनबंधू ग्रामीण विकास संस्थेचा अभिनव कृतीशील उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

देवरी : 'विद्यार्थ्यांनी जागरूक होऊन शिक्षण घ्या' असा संदेश देणारे जगातील सर्वोत्तम विद्यार्थी म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणून यांच्या जयंतीनिमित्त केले जाणारे अभिवादन हे ...





## सामाजीक :

### २) सत्कार : (दि.०१ आक्टोंबर २०२२)

स्थान :- शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, गोंदिया

**आयोजनाचे उद्देश :**

गोंदिया जिल्हयातील विविध तालुक्यात रक्तदान शिबीर आयोजित करणाऱ्या सामाजिक संस्थांना सामाजिक बळ मिळावे या उद्‌देशाने शासकिय वैद्यकिय महाविद्यालय गोंदिया अंतर्गत बाई गंगाबाई रक्तपेढी गोदिया द्वारा या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**उपस्थित मान्यवर :**

मा.श्री.डॉ. कुसुमाकर घोरपडे अधिष्ठाता शा.वै.म.गोंदिया., मा.श्री. पंकज यादव नगरसेवक गोंदिया, मा.श्री.डॉ. व्ही.पी.रुखमोडे, मा.श्री.डॉ. नंदकिशोर जायस्वाल, मा.श्री.डॉ. शैलेंद्र यादव

**आयोजनाचे साफल्य :**

गोंदिया जिल्हयात महत्वपुर्ण दिनाचे औचित्य साधुन विविध तालुक्यातील ठिकाणी सामाजिक संस्था आणि संघटना यांच्याद्वारे रक्तदान शिबीराचे आयोजन केले जाते. या सामाजिक संस्थेद्वारे होत असलेल्या सहकार्याबद्‌दल आरोग्य विभागाला मोठे योगदान मिळत असल्याने आरोग्य विभागाच्या वतीने जिल्हयातील काही ठरावीक सामाजिक संस्थांची निवड करण्यात आली असुन त्यामध्ये दिनबंधु ग्रामीण विकास संस्थेची निवड करुन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन सन्मानीत करण्यात आले.






## आरोग्य :

### ३) दमा या आजारावर औषध वितरण शिबीर :

दि.०९ ऑक्टोबर २०२२

स्थळ :- मॉ धुकेश्वरी मंदिर सभागृह देवरी, ता.देवरी, जि.गोंदिया.

**उपस्थित मान्यवर -**

मा.श्री.ॲड.प्रशांत संगीडवार अध्यक्ष मॉ धुकेश्वरी मंदिर समिती देवरी, मा.श्री.सुशिल शेन्द्रे सचिव मॉ धुकेश्वरी मंदिर समिती देवरी, मा.श्री.डॉ.सुनिल समरीत अध्यक्ष सुवर्णप्राशन फाऊंडेशन, मा.श्री. विनोद चौधरी संचालक जि.प.कर्मचारी पतसंस्था भंडारा व अन्य मान्यवर.

**विशेष सहकार्य :**

सुवर्णप्राशन फाऊंडेशन





**आयोजनाचे साफल्य :**

कोजागीरी पोर्णीमाचे औचित्य साधुन दरवर्षी संस्थेद्वारे आयोजित या औषध वितरण शिबीराला विदर्भातुन भरभरुन प्रतिसाद मिळत असुन या शिबीरात विदर्भातील सर्वच जिल्हयातुन रुग्ण सहभागी होवुन सर्वांना आयोजकाद्वारे मोफत औषध वितरण करण्यात आले असुन यावर्षी जवळ-जवळ ४५० रुग्णांना दमा या आजाराची औषध वितरण करण्यात आले.







## आरोग्य/सामाजिक :

### ४) राष्ट्रीय जंतनाशक दिन (दि.१० ऑक्टोबर २०२२)

स्थान :- जि.प.वरीष्ठ प्राथमिक शाळा कन्हाळगांव, ता.देवरी, जि. गोंदिया

**आयोजनाचे उद्देश :**

राष्ट्रीय ग्रामीण स्वास्थ मिशन आणि महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाअंतर्गत संपुर्ण देशात जंतनाशक मोहिम राबविण्यात येत असुन संस्थे अंतर्गत सामाजिक बांधिलकी म्हणुन या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**उपस्थित मान्यवर :**

मा.डॉ.दोशांत हुमने आरोग्य अधिकारी देवरी, मा.श्री.प्रकाश सहारे मुख्याध्यापक जि.प.प्राथमिक शाळा कन्हाळगांव, मा.श्री.कुलदिप लांजेवार अध्यक्ष दिनबंधु ग्रामीण विकास संस्था देवरी, मा.श्री. टिकाराम मातवारे स.शि.जि.प.प्राथमिक शाळा कन्हाळगांव.

**आयोजनाचे साफल्य :**

आदिवासी बहुल ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये शालेय अभ्यासक्रमासोबत इतर सामाजिक विषयांचा अभ्यास व्हावा आणि शासनाच्या आरोग्य विभागाद्वारे राबविण्यात येणाऱ्या माहिमेचा संदेश नागरीकांपर्यंत पोहचावा या उद्देशाने संस्थेद्वारे या उपक्रमाचे आयोजन जि.प.वरीष्ठ प्राथमिक शाळा कन्हाळगांव येथे करण्यात आले. आणि या उपक्रमात सहभागी सर्व विद्यार्थी आणि ग्रामस्थांना राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेविषयी माहिती देण्यात आली आणि विद्यार्थ्यांना जंतनाशक गोळीचे वितरण करण्यात आले.


नवराष्ट्र
कन्हाळगावात जंतनाशक दिन उत्साहात साजरा

देशोन्नती
कन्हाळगांव येथे राष्ट्रीय जंतनाशक दिन साजरा
दिनबंधु ग्रामीण विकास संस्था तर्फे आयोजन

कन्हालगांव में बच्चों को बांटी गई कृमिनाशक गोलियां

लोकमत
कन्हाळगाव येथे जंतनाशक गोळ्यांचे वाटप

पुण्यनगरी
कन्हाळगाव येथे राष्ट्रीय जंतनाशक दिनाचे यशस्वी आयोजन








## सामाजिक :-

### ५) ''आमची दिवाळी वंचितांसाठी'' (दि.२५ ऑक्टोंबर २०२२)

स्थान :- ग्राम-बोगाटोला, ता.देवरी, जि.गोंदिया.

**आयोजनाचे उद्देश :**

दिवाळी हा आनंद, प्रकाश आणि आपुलकीचा सन आहे. परंतु समाजातील अनेक वंचित, गरजु व दुर्बल घटक आर्थिक व सामाजिक परिस्थितीमुळे या आनंदापासुन दुर राहतात, अशा बांधवांच्या जीवनातही दिवाळीचा प्रकाश आणि आनंद निर्माण व्हावा या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतुन संस्थेद्वारे ''आमची दिवाळी वंचितांसाठी'' या उपक्रमाचे आयोजन गोंदिया जिल्हयातील देवरी तालुक्यातील अतिसंवेदनशील, नक्षलग्रस्त आदिवासीबहुल भागातील ग्राम-बोगाटोला येथे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

**उपस्थितीत मान्यवर :**

मा.श्री.डॉ.सुनिल समरीत अध्यक्ष सुवर्णप्राशन फाऊंडेशन, मा.श्री.चेतन उईके संघटक बिरसा ब्रिगेड, मा.श्री.कुलदिप लांजेवार अध्यक्ष दिनबंधु ग्रामीण विकास संस्था देवरी, मा.श्री.महेश रहांगडाले मुख्याध्यापक ककोडी, मा.श्री.निखील झिंगरे सामाजिक कार्यकर्ता चिचगड.

**आयोजनाचे साफल्य :**

भारतीय संस्कृतिमधील महत्वाचा दिवाळी हा सण, साजरा करण्यापासुन वंचित असलेल्या ग्राम-बोगाटोला येथील संस्था आणि सुवर्णप्राशन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमाअंतर्गत उपस्थित ग्रामातील सर्व कुटूंबातील सदस्यांना फराळ, शालेय साहित्य, वस्त्र आणि खेळाडुंना क्रिडा साहित्य वितरण करुन स्थानिक ग्रामवासियांसोबत दिवाळी हा सण संस्थेच्या पदाधिकारी आणि सहकारी मित्रपरिवार यांनी साजरा केला तेव्हा ग्रामवासीयांच्या चेहऱ्यावर एक वेगळा आनंद निर्माण झाल्याचे दिसुन आले जवळ-जवळ या गावातील ४५ कुटूंबातील सर्व सदस्यांना साहित्य वितरण करुन आमची दिवाळी वंचितांसाठी हा उपक्रम साजरा करण्यात आला.





# संस्थेचे कार्य



'हमारी दिवाली वंचितों के लिए उपक्रम'

सुवर्ण प्राशन फाउंडेशन व मित्र परिवार का आयोजन

नवराष्ट्र

'आमची दिवाळी वंचितांसाठी' : दीनबंधु ग्रामीण विकास संस्था आणि सुवर्णप्राशन फाउंडेशनचा उपक्रम

जंगलव्याप्त गावात वंचितांसह दिवाळी

शैक्षणिक आणि क्रीडा साहित्याचे वाटप

लोकमत

आमची दिवाळी वंचितासाठी उपक्रम

दीनबंधू ग्रामीण विकास संस्था आणि सुवर्णप्राशन फाउंडेशन : दोन वर्षांपासून आयोजन

शैक्षणिक आणि क्रीडा साहित्याचे वाटप

पुण्यनगरी

'आमची दिवाळी वंचितासाठी' उपक्रम

दीनबंधू ग्रामीण विकास संस्था व सुवर्णप्राशनचा उपक्रम

दीपावली पर ग्रामीणों को बांटे नए कपड़े और मिठाई

Sat, 29 October 2022 https://epaper.bhaskarhindi.com/c/7076

बोगाटोला येथे 'आमची दिवाळी वंचितांसाठी' या उपक्रमाचे आयोजन

नवीन कपडे, शालेय, क्रीडा साहित्य आणि फराळाचे वितरण







## सामाजीक-शैक्षणिक :

### ६) भारतीय संविधानदिन (दि.२६ नोव्हेंबर २०२२)

स्थान :- सार्वजनिक वाचनालय व अभ्यासिका केंद्र देवरी

**आयोजनाचे उद्देश :**

स्पर्धा परिक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये भारताच्या संविधानाबद्‌दल जागरुकता निर्माण व्हावी, संविधानाने दिलेले मुलभुत अधिकार आणि कर्तव्य याची जाणीव व्हावी, युवक व युवतींमध्ये लोकशाही मुल्य, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रभक्तीची भावना रुजु व्हावी यासोबतच समता, बंधुता, न्याय व स्वातंत्र्य या संविधानातील मुलभुत तत्वाचा प्रचार-प्रसार व्हावा आणि अभ्यासिकेच्या माध्यमातुन स्पर्धा परीक्षा व शैक्षणिक प्रगतीसाठी विद्यार्थी प्रेरीत व्हावे या उद्‌देशान उपक्रमाचे आयोजन.

**उपस्थिती मान्यवर :**

मा.श्री.आचार्य हरिभाऊ वेरुळकर गुरुजी, मा.श्री.आनंद घाडगे पोलीस उपनिरीक्षक देवरी, मा.श्री.मंगेश वानखेडे पोलीस उपनिरीक्षक देवरी, मा.श्री.तेजदासजी मते से.नि.प्राध्यापक

**आयोजनाचे साफल्य :**

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था देवरी तर्फे सार्वजनिक वाचनालय व अभ्यासीका केंद्र देवरी येथे आयोजित संविधान दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी उपस्थित मान्यवरांनी भारतीय संविधानाचे महत्व नागरीकांचे अधिकार व कर्तव्य या विषयी विद्यार्थ्यांना व नागरीकांना मार्गदर्शन केले. दरम्यान संविधानाच्या प्रस्तावनेचे सामुहिक वाचन करुन लोकशाही मुल्यांप्रति आपली बांधिलकी दृढ करण्यात आली. या उपक्रमामुळे युवकांमध्ये संविधानाबद्‌दल जागरुकता निर्माण होऊन सामाजिक बांधिलकीची जाणीव अधिक मजबुत झाली.



नोंदणी क्र. २२६/१४ एफ-१८५६ (गोंदिया)

DINBANDHU

Gramin Vikas sanstha, Deori

दिनबंधु ग्रामीण विकास संस्था, देवरी

ता.देवरी जि.गोंदिया.